महसूल विभागामार्फत दिनांक १७/९/२०२६ ते दिनांक १७/१०/२०२६ या कालावधीत राबवावयाचे सेवा संकल्प अभियान....

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.७३/समन्वय-१**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०००३२**
**दिनांक : १७ सप्टेंबर, २०२६**

**संदर्भ :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/रवका-२, दिनांक ९/९/२०२६
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१, दिनांक २५/३/२०२६
३) महसूल विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जमीन-३०२६/प्र.क्र.८९/जमीन-६, दिनांक १०/०९/२०२६
४) महसूल विभाग, शासन पत्र क्र.R&FD-८६०३०/९/२०२६-FAR-REV(E-१८२१६८०, दिनांक ३१/८/२०२६

**शासन परिपत्रक :-**

संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णयानुसार दिनांक १७/९/२०२६ ते दिनांक १७/१०/२०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविले जात आहे. सदर अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सेवा सेतू अभियानांतर्गत शिबीर आयोजित करून राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांचे थेट लाभ नागरिकांना प्राप्त करून देण्यात येणार आहेत.

महसूल विभाग हा जमीन व नागरिकांच्या दैनंदिन सेवांशी सर्वाधिक संबंधित असलेला विभाग असल्याने, सदर अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीत महसूल यंत्रणेची भूमिका निर्णायक ठरणार आहे. संदर्भ क्रमांक (१), (२), (३) व (४) च्या शासन निर्णयांच्या अंमलबजावणीसंदर्भात जिल्हा, उप विभाग व तालुका पातळीवरील सर्व महसूल अधिकारी/कर्मचारी यांना खालील सूचना देण्यात येत आहेत व त्यांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

**१. सेवा सेतू अभियान शिबीरांचे आयोजन :-**

१.१) प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आयोजित होणाऱ्या सेवा सेतू शिबीरांमध्ये महसूल यंत्रणेमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिल्या जाव्यात. शिबीरात येणाऱ्या नागरिकांची थेट सेवा पद्धतीने निराकरणासाठी तलाठी, मंडळ अधिकारी यांनी उपस्थित राहावेत.

१.२) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर हे देखील सेवा सेतू अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एका ठिकाणी आयोजित करावेत व शिबीराचे वेळापत्रक आगाऊ जाहीर करावे.

१.३) जिल्हाधिकारी यांनी संदर्भ क्रमांक (१) अन्वये गठित केलेल्या जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीच्या बैठका घेऊन शिबीरांचे नियोजन, समन्वय व यशस्वी संचालन करावे.

१.४) उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागामध्ये राबवावयाच्या योजनांबाबतची माहिती संबंधित विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, लोकसभा / राज्यसभा सदस्य यांना समक्ष भेट घेऊन द्यावी. तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी यांचाही या अभियानामध्ये सहभाग सुनिश्चित करावा.

१.५) या सेवा सेतू अभियानाची प्रचार व प्रसिध्दी जिल्हास्तरापासून ते गावस्तरापर्यंत करण्यात यावी.

**२. शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमनुकूल करणे :-**

२.१) संदर्भ क्रमांक (२) च्या शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीवरील दिनांक ०१/०१/२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे निर्धारित अटी व शर्तींच्या अधीन नियमानुकूल केली जाणार आहेत. सदर योजनेंतर्गत अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/१२/२०२६ असल्याने, अभियान कालावधीत पात्र अतिक्रमण धारकांना जास्तीत जास्त अर्ज करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती व प्रचार करावा.

२.२) अभियान कालावधीत प्रत्येक तहसील/मंडळ/गाव पातळीवर अतिक्रमण नियमानुकूलनाबाबत सहाय्य केंद्रे उभारून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज व पुरावे स्वीकारण्यात यावेत. ग्रामीण भागात ग्राम महसूल अधिकारी यांनी अर्ज स्वीकारून ते संबंधित तहसीलदार यांना अग्रेषित करावेत व स्वतंत्र अर्ज नोंदवही ठेवावी; अर्जदारास पोच देण्यात यावी.

२.३) प्राप्त अर्जांची छाननी करताना अतिक्रमण केवळ स्व-राहण्यासाठी (निवासी हेतूने) असणे, दिनांक ०१/०१/२०११ पूर्वीचे असणे, अर्जदार भारताचे नागरिक असणे, एका कुटुंबाला संपूर्ण राज्यात एकच अतिक्रमण (शपथपत्रासह) असणे व अतिक्रमण असलेली जागा नियोजनात निवासी प्रयोजनासाठी वापरास अनुज्ञेय असणे या बाबींची पडताळणी कालबद्ध पद्धतीने करावी.

२.४) भूमी अभिलेख विभागाशी समन्वय साधून अतिक्रमणाची विनाशुल्क मोजणी व सीमांकन करण्याची कार्यवाही अग्रक्रमाने पूर्ण करावी.

२.५) शासन निर्णयानुसार गठित समित्या (ग्रामीण भाग - तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली; “ब” व “क” वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत-उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली; महानगरपालिका - जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली) यांनी नियमित बैठका घेऊन अर्ज प्राप्तीनंतर ९० दिवसांच्या आत निर्णय देण्यासाठी प्रयत्न करावेत.

**३. वनहक्क दावे निकाली काढणे व वनपट्टे वाटप :-**

३.१) संदर्भ क्रमांक (३) नुसार दिनांक १७/९/२०२६ ते दिनांक २/१०/२०२६ या कालावधीत राज्यात विशेष कालबद्ध वनहक्क मोहीम राबविली जात आहे. मोहीम कालावधीत खालील वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी:

अ) दि.१७, १८ व १९/९/२०२६ - ग्रामस्तरीय वनहक्क समितीच्या बैठका घेऊन नवीन वनहक्क दाव्यांची तपासणी, संबंधित अभिलेख, क्षेत्र, सीमांकन व स्थळपडताळणी करून मान्य/नामंजूर मान्यतेबाबत विहित पद्धतीने निर्णय नोंदवावा.

ब) दि.३०/०९/२०२६ ते २/१०/२०२६ - ग्रामसभांनी अंतिम केलेले दावे उपविभागीय स्तरीय वनहक्क समितीकडे पाठावेत; तसेच उपविभागीय व जिल्हास्तरीय वनहक्क समित्यांच्या बैठका घेऊन प्रलंबित दाव्यांवर अंतिम निर्णय घ्यावा.

३.२) यापूर्वी वनहक्क मंजूर झालेल्या पात्र वनहक्कधारकांची स्वतंत्र यादी तयार करून, त्यांना ७ई/१२ई उताऱ्यांमध्ये वनहक्क अभिलेख/वनपट्टा प्रदान करण्याची विशेष मोहीम दि.३०/९/२०२६ ते २/१०/२०२६ या कालावधीत पूर्ण करावी व पट्टे समारंभपूर्वक वितरण करावे.

३.३) मोहिमेंतर्गत प्राप्त व प्रलंबित दाव्यांची व वनपट्टे वाटपाची माहिती प्रपत्र-१ ते प्रपत्र-६ मध्ये संकलित करावी; दि.१७/०९/२०२६ ते १९/०९/२०२६ तसेच दि.३०/०९/२०२६ ते २/१०/२०२६ या कालावधींतील कार्यवाहीचे स्वतंत्र प्रगती अहवाल विहित नमुन्यात शासनास (महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई) सादर करावेत.

३.४) दाव्यांची स्थळपडताळणी व अभिलेखीय पडताळणी महसूल व वन विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने पूर्ण करावी.

**४. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना :-**

मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेकरीता विधानसभा क्षेत्रनिहाय समित्या गठीत करण्यात आल्या असून उपविभागीय अधिकारी हे सदर समितीचे सदस्य सचिव आहे. ही योजना राज्याची एक फ्लॅगशिप योजना असून या योजनेंतर्गत रस्त्यांचे प्रकल्प तयार करण्यात आलेले आहेत. तसेच सदर रस्त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या असून ब-याच रस्त्यांना अद्यापि प्रशासकीय मान्यता देणे बाकी आहे. या अभियान कालावधीत प्राप्त झालेल्या रस्त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता व कार्यादेश देण्याची कार्यवाही प्राधान्याने करावी.

**५. इतर खात्यांच्या विशेष सहाय्य योजनांची अंमलबजावणी :-**

५.१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग इत्यादी खात्यांच्या विशेष सहाय्य योजनांचे लाभ शिबीरांमध्ये लाभार्थ्यांना थेट पोहोचवण्यासाठी संबंधित खात्यांनी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांशी आगाऊ समन्वय करावा.

५.२) शिबीरांमध्ये जात प्रमाणपत्र, आधार कार्ड वितरण, जन्म दाखला इत्यादी विविध दाखले व प्रमाणपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून इतर खात्यांच्या योजनांच्या अर्जांसाठी नागरिकांना पुन्हा पुन्हा शासकीय कार्यालयांमध्ये यावे लागणार नाही.

**६. प्रगतीचा अहवाल व संनियंत्रण :-**

६.१) जिल्हाधिकारी यांनी अभियानाच्या अंमलबजावणीचे जिल्हा पातळीवर समन्वय व संनियंत्रण करावे; उपविभागीय अधिकाऱ्यांनी उपविभाग स्तरीय कार्यवाहीचा नियमित आढावा घ्यावा; तहसीलदार व ग्रामस्तरीय अधिकारी/कर्मचारी यांनी सोपविलेली कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी.

६.२) अभियान कालावधीत शिबीरांमधून पार पडलेल्या कार्यवाहीची साप्ताहिक प्रगती जिल्हा पातळीवर संकलित करावी व अभियान समाप्तीनंतर संकलित अंतिम अहवाल महसूल विभागाकडे सादर करावा.

६.३) शिबीरांचे छायाचित्रण/व्हिडिओ करून त्यांचे संकलन करावे व ते माहिती व जनसंपर्क विभागास उपलब्ध करावे.

सदर सूचनांच्या अंमलबजावणीत संबंधितांनी अत्यंत गांभीर्याने प्रयत्न करावेत व हे अभियान यशस्वीरित्या पार पाडले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०९१७१८३५१४६३४८ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.09.17 18:36:11 +05'30'

**(संजय बनकर)**

**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक विभाग) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.

६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.

७) मा.मंत्री (महसूल), मंत्रालय मुंबई - ३२

८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र, मुंबई.

८) मा.राज्यमंत्री (महसूल), मंत्रालय, मुंबई -३२

९) सर्व सन्माननीय राज्यसभा / लोकसभा सदस्य,

१०)विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई.

११) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.

१२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

१३) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

१४) सर्व विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

१५) सर्व विभागीय आयुक्त.

१६) सर्व जिल्हाधिकारी.

१७) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८) निवड नस्ती (कार्यासन समन्वय-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.